# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय, अकोला

दूरध्वनी क्र. 0724-2424442 फॅक्स 0724-2435007

email address -rdc_akola@rediffmail.com web address :www.akolanic.in


क्र.कक्ष2/गृह/प्र.स./कावि 270 /2020 दिनांक: /05/2020

वाचा — 1. आपत्ती व्यवस्थापन कायदा — 2005
2. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग दिनांक 13 मार्च, 2020
3. साथरोग अधिनियम,1897
4. सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई यांची अधिसूचना दिनांक 14 मार्च 2020
5. या कार्यालयाचे आदेश क्र.कक्ष२/प्रस/गृह/कावि 216 /2020 दिनांक 14.04.2020
6. या कार्यालयाचे आदेश क्र.कक्ष२/प्रस/गृह/कावि 242 /2020 दिनांक 19.04.2020
7. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचे आदेश क्र. DMU/२०२०/CR.92/ DisM-1 Dated 2nd May 2020

**(दिनांक 03.05.2020 चे मध्यरात्रीपासून ते दिनांक 17.05.2020 चे मध्यरात्रीपर्यंत जिल्हयातील संचारबंदी कायम ठेवणे बाबत)**

## आदेश

**ज्या अर्थी**, शासनाने करोना विषाणूचा (कोव्हिड 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग अधिनियम 1897 मधील खंड 2,3 व 4 दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू केली असून महाराष्ट्र शासनाने कोव्हीड — 19 कोरोना विषाणू वर उपाययोजना नियम-2020 नुसार दिनांक 14 मार्च 2020 रोजी अधिसूचना निर्गमित केली आहे. यातील नियम क्र. 3 नुसार कोरोना विषाणूमूळे (COVID-१९) उद्भ्वलेल्या संसर्गजन्य रोगाचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंध व नियंत्रण या साठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषीत केले आहे. **आणि**

**ज्याअर्थी**, अकोला जिल्हयामध्ये दिनांक 03.05.2020 चे मध्यरात्रीपर्यंत जिवनावश्यक व अत्यावश्यक सेवा वगळता सिमाबंदी व संचारबंदी लावण्यात आली आहे. **आणि**

**ज्याअर्थी**, अकोला जिल्हयामध्ये दिनांक 20.05.2020 पासून संचारबंदीचे कालावधीमध्ये अत्यावश्यक व मुलभूत सेवा वगळून दिनांक 03.05.2020 चे मध्यरात्रीपर्यंत सिमाबंदी व संचारबंदी लावण्यात आली आहे. **आणि**

**ज्याअर्थी**, महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग यांचे आदेश क्र. DMU/2020/CR.92/ DisM-1 दिनांक २ मे २०२० नुसार दिनांक 17 मे 2020 पर्यंत संचारबंदी पुढे कायम ठेवणे बाबत सूचित केले आहे. **आणि**

**ज्याअर्थी**, अकोला जिल्हयामध्ये कोरोना विषाणूचा संसर्ग झालेल्या रुग्णांमध्ये झपाटयाने वाढ होत आहे. त्या अनुषंगाने कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव फैलाव होण्याचे दृष्टीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे गरजेचे झाले असल्याची माझी खात्री झाली आहे.

**त्याअर्थी**, मी, **जितेंद्र पापळकर,भाप्रसे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधीकारी अकोला,** आपत्ती व्यवस्थापन कायदा- 2005 , साथरोग अधिनियम 1897 मधील खंड 2,3 व 4 व महाराष्ट्र शासनाची दिनांक 14 मार्च 2020 चे अधिसूचनेनुसार मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार अकोला जिल्हयात **दिनांक 03.05.2020 चे मध्यरात्रीपासून ते 17.05.2020 चे मध्यरात्रीपर्यंत** संदर्भीय आदेश क्र. 5 व 6 मध्ये नमूद केल्याप्रमाणे तसेच या कार्यालयाने वेळोवेळी कोरोना विषाणूचा होणारा प्रादुर्भाव फैलाव रोखण्याकरिता खालील प्रमाणे नमूद केल्यानुसार **दिनांक 17 मे च्या मध्यरात्रीपर्यंत जिल्हयात** या कार्यालयाने वेळोवेही निर्गमित केलेले आदेश कायम ठेवून **संचारबंदी** लागू करण्याचे आदेश निर्गमित करित आहे.

**अ) दिनांक 03.05.2020 चे रात्री 12.00 वाजेपासून दिनांक 05.05.2020 चे रात्री 12.00 वाजेपर्यंत.**

1. महागरपालिका क्षेत्रातील शासकीय / खाजगी रुग्णालये/क्लीनीक/ ॲम्ब्युलंस सेवा/ औषधीची दुकाने वगळता सर्व अत्यावश्यक सेवा पूर्णतः बंद राहतील.

NitinN 365

2. दुध व दुग्धजन्य पदार्थाची विक्री सकाळी 06.00 ते दु. 10.00 तसेच सायं. 04.00 ते सायं. 06.00 या कालावधीत सुरु राहील.
3. महानगरपालिका क्षेत्रामधील सर्व प्रकारच्या बँका ,एलआयसी इ. सेवा बंद राहतील.
4. संचारबंदीच्या कालावधीमध्ये अत्यावश्यक सेवे करिता नियुक्त केलेले कर्मचारी व्यतीरिक्त कोणत्याही व्यक्तींना मुक्त संचार करता येणार नाही.
5. महानगर पालिका क्षेत्रामध्ये कार्यालयाकडून सुरु ठेवण्यात आलेले नगरपरिषद/ ग्रामीण भागातील पेट्रोल/डिझेल पंप वगळून इतर सर्व पेट्रोल/ डिझेल पंप पूर्णतः बंद राहतील.
6. महाराष्ट्र औद्योगीक विकास महाममंडळ, अकोला येथील परवानगी दिलेले उद्योग सुरु राहतील.
7. तथापी **नगर परिषद व ग्रामीण भागाकरिता** या कार्यालयाने दिनांक 19.04.2020 रोजी संपूर्ण जिल्हयाकरिता निर्गमित केलेले आदेश जैसे थे लागू राहतील.
8. या कार्यालयाकडून विविध प्रयोजनकरिता निर्गमित केलेल्या परवानग्या पुढील आदेशापर्यंत कायम ठेवण्यात येत आहेत.
9. अत्यावश्यक सेवेतील शासकीय कार्यालये विहीत केलेल्या आदेशानुसार सुरु राहतील.

ब) **दिनांक 6,8,10,12,14 व 16 मे 2020 रोजी दिनांक 19.04.2020 नुसार निर्गमित केलेल्या आदेशानुसार संचारबंदी कायम राहील.**

क) **दिनांक 7,9,11,13,15 व 17 मे 2020 रोजी उपरोक्त "अ" मध्ये नमूद केल्यानुसार संचारबंदी कायम राहील.**

**सदर आदेश हे दिनांक 04.05.2020 चे मध्यरात्रीपासून लागू करण्यात येत असून दिनांक 17.05.2020 चे मध्यरात्रीपर्यंत लागू राहतील.**

या आदेशाद्वारे विहीत करण्यात आलेल्या कोणत्याही निर्बधांची किंवा, काढलेल्या आदेशाची अवज्ञा करणा-या कोणत्याही व्यक्तीने, **भारतीय दंड संहिता,** (1860 **चा** 45 ) **याच्या कलम** 188 अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध केला आहे असे मानन्यात येईल.

सदर आदेश आज **दिनांक** 03 **मे** 2020 रोजी माझे स्वाक्षरी व शिक्यानिशी निर्गमित करण्यात येत आहे.

**(जितेंद्र पापळकर,भाप्रसे)**
**जिल्हादंडाधिकारी, अकोला**
जिल्हादंडाधिकारी,अकोला

**प्रतिलिपी-**

1. मा. विभागीय आयुक्त, *अमरावती* विभाग, अमरावती यांना माहिती करिता सादर.
2. जिल्हा पोलीस अधिक्षक, अकोला यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता.
3. आयुक्त, महानगर पालिका अकोला यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता.
4. जिल्हा पुरवठा अधिकारी, अकोला यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता. त्यांनी सदर आदेशाचे तंतोतत पालन होण्याचे दृष्टीने आपले अधिनस्त अधिकारी / कर्मचारी यांना परस्पर कळविण्याकरिता.
5. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, अकोला यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता.
6. सहा. आयुक्त, अन्न व औषधी प्रशासन, अकोला यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता. . त्यांनी सदर आदेशाचे तंतोतत पालन होण्याचे दृष्टीने आपले अधिनस्त अधिकारी / कर्मचारी यांना परस्पर कळविण्याकरिता.
7. मॅनेजर लिड बँक, अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
8. उपविभागीय अधिकारी ---------------------------- सर्व यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
9. तहसिलदार -------------------------------------- सर्व यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.
11. जिल्हा माहिती अधिकारी, अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.

**जिल्हादंडाधिकारी, अकोला**
जिल्हादंडाधिकारी,अकोला